# सुरत-चेन्नई महामार्ग प्रकल्पाला मिळणार गती

## कॅबिनेट मंडळाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर

नाशिक । प्रतिनिधी



सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गाच्या महाराष्ट्रातील टप्प्याला गती मिळाली असून, आडगाव (नाशिक) ते सोलापूर दरम्यानच्या ३८३ किमी महामार्गाच्या प्रत्यक्ष उभारणीस भारत सरकारच्या इकोनॉमिक अफेअर्स विभागाची मंजुरी मिळाली आहे. मात्र केंद्रीय मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट मंडळाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर झाला असून, मंजुरीनंतर लगेचच काम सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सूरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गाच्या उभारणीसाठी वनखात्याची जमीन मोठ्या प्रमाणात अधिग्रहीत करावी लागणार आहे वन खात्याला पर्यायी जागा द्यावी लागत असल्यामुळे नियोजनामध्ये विलंब लागत असल्याचे अधिकारी स्तरावर बोलले जात आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या मते हे प्रकरण कॅबिनेटच्या मंजुरीसाठी प्रलंबित असून त्यानंतर कामाला सुरुवात केली जाईल असे बोलले जात आहे. प्रत्यक्षात गेल्या दीड वर्षापासून हे काम थंड बस्त्यात आहे.

**नाशिकसाठी ठरेल वरदान**

नाशिकच्या उद्योग विश्वाला गती देण्यासाठी सुरत चेन्नई ग्रीन फिल्ड मार्ग हा बहुउद्देशीय ठरणार आहे येणाऱ्या काळामध्ये वाढवणे बंदरातून नाशिकचे कनेक्शन तयार होणार आहे. नाशिक मधून सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग, दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग, नाशिक-पुणे एक्सप्रेस हायवे अशा विविध शहरांशी जोडणाऱ्या माहामार्गांमुळे गतिमान होत असल्यामुळे देशभरात मालाची आवक जावक बंदरातून करण्याच्या दृष्टीने नाशिक हे मध्यवर्ती केंद्र बनणार आहे. त्यामुळे ग्रीनफिल्ड गतीने उभे राहणे हे नाशिकच्या विकासाला खऱ्या अर्थाने वरदान ठरणार आहे.

**प्रकल्पातील पहिला टप्पा**

नाशिकच्या आडगाव येथून सोलापूर पर्यंत ३८३ किमी रस्त्याचे काम.

दिंडोरीतील आंबेगण ते सोलापूर या ४१३ किमी साठी भू-संपादन.

पहिल्या टप्प्यात ९९५ हेक्टरपैकी ८५० हेक्टर जमीन संपादित होणार.

**दुसरा टप्पा (प्रलंबित)**

आडगाव ते सूरत प्रत्यक्ष बांधकाम.

आंबेगण ते सूरत भू-संपादन.

मोठ्या प्रमाणावर जंगल असल्याने वन खाते व पर्यावरण विभागाची मान्यता आवश्यक.

**नाशिकजिल्ह्यातीलकामाचा आढावा**

एकूण अंतर : १२१ किमी

तालुके : सुरगाणा, पेठ, कळवण, दिंडोरी, नाशिक, निफाड, सिन्नर

गावे : ६९ गावांतून मार्ग

खर्च : ८०० कोटींचा खर्च अपेक्षित

सिन्नरमध्ये समृद्धी व नाशिकमध्ये आग्रा महामार्गाशी जोडणी

**राज्यातील एकूण परिस्थिती**

एकूण अंतर : सोलापूर ते राक्षसभुवन ४५१ किमी

भू-संपादन : ११८९ हेक्टर (आंबेगणपर्यंत)

अंदाजित खर्च : १५९९ कोटी

**महत्वाच्या जोडण्या :** सोलापूर, बीड, अहमदनगर, नाशिक, सूरत

सूरत-नाशिक अंतर २२५ किमीवरून १७६ किमी, अवघ्या २.५ तासांत प्रवास शक्य होणार आहे.

**शेतकऱ्यांची अडचण**

जानेवारी २०२२ पासून जागा अधिग्रहण प्रक्रिया थांबलेली आहे. कर्ज भरून एनओसी घेतल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अडचण होत आहे. काही शेतकऱ्यांनी पर्यायी जमीन आरक्षित करताना इसार रक्कम भरली होती.ते सर्वच निर्णयाच्या लांबणीने अडचणीत सापडले आहेत.या बाबत तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी सूरत-चेन्नई शेतकरी संघर्ष समितीने केली आहे.

> सरकारच्या इकोनॉमिक अफेअर्स विभागाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर रस्ते प्राधिकरणाकडून प्रस्ताव केंद्रीय कॅबिनेटसमोर ठेवण्यात आला असून, लवकरच त्याला मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतरच कामाला सुरुवात केली जाईल.
>
> ■ **श्रीकांत ढगे**, प्रकल्प संचालक

## आगरी सेना प्रदेश उपाध्यक्षपदी पाटील

**सातपूर ।** आगरी सेनेच्या ३९ व्या वर्धापनदिनी उद्योजक रवींद्र पाटील यांची आगरी सेनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपणासह मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगरी सेना जिल्हाध्यक्ष संपत डावखरे तर प्रमुख पाहुणे म्हणून युवा जिल्हाध्यक्ष अरुण भागडे, उपाध्यक्ष अनिल भोपे, श्याम चव्हाण, चंद्रकांत आडोळे, हिरामण मोरे उपस्थित होते. उपजिल्हाध्यक्ष सूचित पाटील यांनी पाहुण्यांचा स्वागत केले.

सातपूर परिसरातील नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आगरी सेनेच्या पदाधिकाऱ्यांसह आर. के.प्लॅनर्स व मधुबन सर्व्हिसेसच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## आजचे कार्यक्रम

* मोहम्मद रफींच्या पुण्यतिथीनिमित्त तुमसा नही देखा हा विशेष संगीतमय कार्यक्रम. स्थळ : हर्षराज सभागृह, बेला व्हिस्टा, भुजबळ फार्म्स रोड. वेळ : सायं. ६.१५ वा

* झूलन यात्रेत विविध धार्मिक कार्यकमाचे आयोजन. स्थळ : श्री श्री राधामदन गोपाल मंदिर, द्वारका वेळ : दिवसभर

* महावितरण नाट्य स्पर्धेत नागपूर प्रादेशिक विभागाचे रंगबावरी, छत्रपती संभाजी नगरचे केस नं. ९९ हे नाटक स्थळ: कालिदास कलामंदिर वेळ : सकाळी १० वाजता, दुपारी २ वाजता

**कालचे कांदा भाव**

| | आवक (किं) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|---|
| लासलगाव | १६८२६ | ६०० | १६२५ | १२७० |
| विंचूर | १६१३५ | ५०० | १४५३ | १२८० |
| निफाड | ७८१५ | ५०० | १४५१ | १३०० |
| सायखेडा | ४२३५ | ८०० | १३०० | १२२५ |
| पिंपळगाव | २३००० | ७० | १८०० | १३५० |

## निधन वार्ता..



### वाळु जाधव

**धारणगाव वीर ।** धारणगाव खडक येथील वाळु मुरलीधर जाधव (८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, मुलगी, दोन भाऊ, बहिण, पुतणे असा परिवार आहे. प्रगतिशील शेतकरी बाजीराव जाधव यांचे ते वडील होत.



### कमलबाई आहेर

**कसबे सुकेणे ।** पिंपरी (ता.निफाड) येथील कमलबाई धनराज पाटील आहेर (९१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. प्रगतिशील शेतकरी साहेबराव व दिलीप पाटील आहेर यांच्या त्या मातोश्री होत.

# प्रदेश काँग्रेस कार्यकारिणी जाहीर

## पानगव्हाणे, आहेर, गायकवाड, कहांडोळे, दिवे यांची नियुक्ती



**नाशिक ।** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या विस्तारित कार्यकारिणीची घोषणा प्रदेशाध्यक्षांनी केली असून, जिल्ह्यातून दोन उपाध्यक्ष आणि तीन सचिवांची नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी राजाराम पाटील पानगव्हाणे आणि शरद आहेर, तर सचिवपदी प्रा. ज्ञानेश्वर गायकवाड, रमेश कहांडोळे आणि राहुल दिवे यांचा समावेश आहे.

मराठा समाजाचे नेतृत्व करणारे आणि ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणारे पानगव्हाणे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. त्यांनी १८ वर्षे जिल्हाध्यक्ष आणि प्रदेश सरचिटणीस म्हणून काम केले असून, विधानसभा निवडणूकही लढविली आहे. त्यांचा समृद्ध संघटनात्मक अनुभव पक्षासाठी मोलाचा ठरणार आहे.

ओबीसी समाजाचे नेतृत्व करणारे शरद आहेर यांनी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद भूषविले असून, गेल्या ३० वर्षांपासून पक्षात सक्रिय आहेत. शहर आणि ग्रामीण भागाला पक्षाने न्याय देत समन्वय साधण्यासाठी या दोघांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मराठा समाजाचे आणि ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणारे प्रा. गायकवाड यांची सचिवपदी नियुक्ती झाली आहे. त्यांनी सरपंच, तालुका अध्यक्ष, जिल्हा प्रवक्ता, जिल्हा कार्यकारिणी सरचिटणीस, अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रभारी, नंदुरबार जिल्ह्याचे निरीक्षक आणि पदवीधर विधानसभा निवडणुकीचे प्रभारी अशी विविध पदे भूषवली आहेत. त्यांचा २४-२५ वर्षांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना ही संधी देण्यात आली आहे. आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे रमेश कहांडोळे यांनी जिल्हा सरचिटणीस आणि उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. युवक काँग्रेसपासून गेल्या २५ वर्षांपासून ते पक्षात सक्रिय आहेत. दिवंगत माजी खासदार झेड. एम. कहांडोळे यांचे पुत्र असलेल्या रमेश यांना ग्रामीण भागातून प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.

मागासवर्गीय समाजाचे नेतृत्व करणारे नाशिक महानगरपालिकेचे माजी नगरसेवक राहुल दिवे यांचीही सचिवपदी निवड झाली आहे. युवक काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष, नगरसेवक आणि शिक्षण मंडळ सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. सर्वसाधारण जागेवर मनपात निवडून येणारे राहुल यांचा संघटनात्मक अनुभव लक्षात घेऊन त्यांना शहरातून प्रदेश कार्यकारिणीत संधी देण्यात आली आहे. जिल्ह्यातील पक्ष संघटनेला बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. शहर आणि ग्रामीण भागातील समन्वय, तसेच विविध समाजघटकांचे प्रतिनिधित्व यामुळे पक्षाच्या कार्याला गती मिळेल. या पाचही पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे काँग्रेस कार्यकर्त्यांकडून स्वागत होत आहे.

## एसएनएफ वाचनालय चळवळीला एपिरॉक मायनिंग इंडियाची मोठी मदत




नाशिक । प्रतिनिधी

आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या सोशल नेटवर्किंग फोरम संस्थेच्या वाचनालय चळवळीला जागतिक ख्यातीच्या एपिरॉक मायनिंग इंडिया प्रा. लि. या कंपनीने ४० लाखांची मदत मंजूर केली आहे. या मदतीचा औपचारिक सामंजस्य करार एपिरॉकच्या जनरल मॅनेजर कथरीना कोलकिंग यांनी एसएनएफचे संस्थापक प्रमोद गायकवाड यांच्याकडे सुपूर्द केला.

याप्रसंगी कंपनीचे प्रमुख धनाजी पुरी, व्यवस्थापक पल्लवी पांडे तसेच अन्य अधिकारी विनायक चंद्रात्रे, प्रियंका वाणी उपस्थित होते. एपिरॉक ही स्वीडनमधील बहुराष्ट्रीय कंपनी असून खाणकाम व पायाभूत सुविधांसाठी आधुनिक व सुरक्षित उपकरणांचे उत्पादन करते. भारतामध्ये पुणे येथे मुख्यालय असून नाशिक व हैदराबाद येथे उत्पादन केंद्रे आहेत. बंगळुरूमध्ये एपिरॉक इंजिनिअरिंग, इनोव्हेशन व टेक्निकल सेंटर आहे. तसेच भारतभर ८ प्रादेशिक केंद्रे आहेत. यासोबतच एपिरॉक भारतातील वाचनचित घटकांच्या शाश्वत विकासात सातत्याने योगदान देत आहे. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात नाशिक जिल्ह्यातील ५ दुर्गम गावांमध्ये लवकरच वाचनालये सुरू केली जातील. दुसऱ्या टप्प्यात, पुणे जिल्ह्यातील ५ व नाशिकमधील आणखी ५ गावांमध्ये वाचनालये उभी केली जातील. या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती वाढवणे आणि तरुणांना स्पर्धा परीक्षांसाठी योग्य साधनसामग्री उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट आहे.

> दुर्गम भागातील तरुणांना वाचन, अभ्यास आणि त्यातून रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी एसएनएफ मोलाची भूमिका बजावत आहे.
>
> ■ **धनाजी पुरी,** सीएसआर प्रमुख, एपिरॉक
>
> एपिरॉकच्या दानशूरतेमुळे हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचे किरण पेरले जातील.
>
> ■ **प्रमोद गायकवाड,** संस्थापक, एसएनएफ

## ‘वंजारी समाजरत्न’ पुरस्कार जाहीर

**नाशिक ।** वंजारी समाज सेवा प्रतिष्ठान व न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य संचलित यांच्या संयुक्त विद्यमाने ‘वंजारी समाजरत्न’ पुरस्कार जाहीर करण्यात आले.

याप्रसंगी भाजप दिव्यांग विकास आघाडीचे उत्तर महाराष्ट्र प्रभारी बाळासाहेब घुगे यांनी माहिती देताना सांगितले की, वंजारी समाजात अनेक व्यक्ती विविध कार्यक्षेत्रात कार्य करत असतात यांचे कार्य समाजापुढे यावे, त्यांना प्रेरणा मिळावी व त्याचबरोबर समाज संघटित होऊन एकत्रित यावा, यासाठी समाजरत्न पुरस्काराचे आयोजन करण्यात आले. पुरस्काराचे वितरण १० ऑगस्ट रोजी डोंगरी वसतिगृह, क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्था या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, माजीमंत्री धनंजय मुंडे यांना देण्यात आले आहे. समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले.

# क्लासिफाईड /सुपरमार्केट


### पाहिजेत

**अनुभवी** ऑफिस अकाऊंटंट आणि टेलीकॉलर पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर. मो.8983101066, 9970630713. (06/08-BK-3493)

### विकणे आहे

**गोविंदनगर** हायवे फ्रंट 2000, 4000 स्के.फूट कमर्शियल शॉप विकणे, गंगापूररोड, चांदशी, मखमलाबाद, आडगाव ॲमिनिटी प्लॉट विकणे. 9637915599. (05/08-BK-3600)

### भाड्याने देणे

**आयुष** एम्पायर कर्मयोगी नगर, सिटी सेंटर मॉलच्या ५ मिनिटाच्या अंतरावर सेकंड फ्लोअर सेमी फर्निश्ड ३ BHK फ्लॅट भाड्याने देणे. मो. 9823093405 (08/08)

### दारुबंदीचा गुरुमंत्र

**द ग्रेट** साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

### व्यसनमुक्ती

**गॅरंटीने** सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www. drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

### सर्व आजारांसाठी

**जुनाट** सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00556)

### नावात बदल

**My** old name Saim Mateen Ahemad Ansari has been changed to my new name Saim Mateen Ansari as per Aadhar No. 2011 7990 5675. (BK-3689)

---

**My** old name Tubafatema Mateen Ahemad Ansari has been changed to my new name Tuba Fatema Mateen Ansari as per Aadhar No. 5474 2637 2621. (BK-3689)

---

**My** old name is Rajashree Suvarna SJ has been changed to new name Suvarna Somnath Joshi as per Aadhar No. 6994 4949 1632 (CM-476)

**My** old name Dipak Jayantilal Pandya has been changed to new name Deepak Jayantilal Pandya as per Aadhar No. 5279 7167 2984. (CM-477)

---

**My** old name Anantkumar Dattatray Kadam has been changed to new name Anant Dattatray Kadam as per Aadhar No. 6261 2798 7903. (CM-477)

---

**My** old name Rashmi Anantkumar Kadam has been changed to new name Rashmi Anant Kadam as per Aadhar No. 2960 0189 8335. (CM-477)

---

**माझे** जुने नाव गांगुर्डे मंदाबाई लक्ष्मण असुन ते दिनांक ३मार्च १९८८ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र भाग २ जी २०० नुसार आता सौ. गायकवाड मंदाकिनी शिवाजी असे करण्यात आले आहे. (CM-478)

---

**My** old Name MUKTARALI KHAN has been changed to new name MUKHTAR LIYAKAT KHAN As Aadhar No. 5456 9579 3011. (CM-479)

---

**I** Have changed My Name From VILSAN BAJIRAV GAIKWAD TO WILSON BAJIRAV GAIKWAD As Aadhar No. 8816 6757 9055. (CM-479)

जाहिरात दर : ◆ क्लासिफाईड डिस्प्ले रु. ६६/- प्रति स्क्वेअर सेमीसेंटर (कॉलम साईज ३.३ सें.मी.) ◆ ४० शब्दापर्यंतच्या छोट्या जाहिराती रु. १६/- प्रतिशब्द ◆ ३+१ फ्री ◆ क्लासिफाईड डिस्प्ले ३+१ फ्री ◆ कमीत कमी शब्दमर्यादा १० शब्द ◆ हायलाईट बॉक्स रु. १५०/- मात्र (प्रति दिवस) ◆ पोस्ट बॉक्स रु. ३००/- मात्र.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ जाहिरात विभाग, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆नाशिकरोड : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६◆ निफाड : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆दिंडोरी : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८◆ मालेगांव : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२◆सिन्नर : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.

**वाचकांना विनम्र सूचना**

‘देशदूत’ वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


पान १ वरून ...

## जि. प. सीईओपदी ओमकार पवार

२०२४ या कालावधीत गडचिरोली येथे परिवीक्षाधीन (प्रोबेशन) कालावधी पूर्ण केला. त्यानंतर ९ सप्टेंबर २०२४ पासून इगतपुरी-त्र्यंबकेश्वर येथे उपविभागीय अधिकारी म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. वर्षभराच्या कार्यकाळात पवार यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. विधानसभा निवडणुकीचे व्यवस्थापन, गोंदे एमआयडीसी येथील ‘जिंदाल’ कंपनीला लागलेली आग आटोक्यात आणण्यात महत्त्वाची भूमिका, तसेच आडवण येथील प्रस्तावित उद्योगासाठी भूसंपादन प्रक्रिया मार्गी लावणे यात त्यांचे योगदान राहिले. आदिवासी योजनांना प्राधान्य देताना त्यांनी शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना २४ तासांत शैक्षणिक दाखले देण्याचा उपक्रम राबवला. अवघ्या तीन महिन्यांत त्यांनी साडेसहा हजारांहून अधिक दाखले वितरित केले. तसेच चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या ‘आपले सेवा केंद्र’ चालकांवर कारवाई करून प्रशासकीय बाबींवर नियंत्रण ठेवले.

## पाच वर्षांत सव्वा लाख उद्योजक

यात शहरी आणि ग्रामीण भागातील तसेच महिलांच्या आणि युवकांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना विशेष प्रोत्साहन दिले जाईल.

महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक स्टार्टअप उद्योग आहेत. ३१ मे २०२५ पर्यंत राज्यातील स्टार्टअप उद्योगांची संख्या २९,१४७ आहे. देशाच्या एकूण स्टार्टअपच्या संख्येत १८ टक्के स्टार्टअप महाराष्ट्रात आहेत. स्टार्टअप उद्योगांना अधिक प्रभावी परिसंस्था तयार करण्यासाठी कालसुसंगत नवीन धोरण आखण्यात आले आहे. या धोरणात नवोपक्रम, उद्योजक, गुंतवणूकदार यांच्यासाठी प्रभावी इकोसिस्टिम विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. या धोरणातील एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे मुख्यमंत्र्यांचा ‘महा-फंड’, ज्यामध्ये ५०० कोटी रुपयांचा निधी असून यामार्फत सुरुवातीच्या टप्प्यातील २५ हजार उद्योजकांना मार्गदर्शन, इन्क्युबेशन आणि आर्थिक मदत दिली जाणार आहे.

## देवभूमीत निसर्गकोप

घुसला. धराली खीरगड येथे पाण्याची पातळी वाढल्याने धराली बाजाराचे मोठे नुकसान झाले. गंगोत्री धामचा मुख्य थांबा असलेल्या धराली येथील खीरगड नदीत ढगफुटी झाल्याने प्रचंड नुकसान झाले. विनाशकारी पुरामुळे सुमारे २० हॉटेल्स आणि होमस्टेचे नुकसान झाले आहे. त्यामुळे अनेक स्थानिक लोक आणि कामगार गाडले गेल्याची शक्यता आहे. उत्तरकाशीमध्ये हरसिल परिसरातील खीरगडच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे आणि धरालीमध्ये झालेल्या नुकसानीमुळे पोलीस, एसडीआरएफ, सैन्य आणि इतर आपत्ती प्रतिसाद पथके घटनास्थळी मदत आणि बचावकार्यात सहभागी झाली आहेत.

## शाळेत चक्कर आल्याने दोन मुलींचा मृत्यू

(१५, रा. टेंटमाळ) ही सकाळी शाळेत आली. प्रार्थना सुरू असताना अचानक चक्कर येऊन बेशुद्ध पडली. तिला शिक्षकांनी ननाशी आरोग्य केंद्रात उपचारासाठी आणले. मात्र, तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. पेठ पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली.वारे येथील शामलाताई बिडकर आश्रमशाळेतील विद्यार्थिनीचा अल्पशा आजाराने मृत्यू झाला. आश्रमशाळेत चौथीत शिकत असलेली १० वर्षीय गायत्री विलास गायकवाड हिचे पोटात दुखू लागले. त्यानंतर कंबरेखाली तिच्या शरीराला संवेदना हरपल्याचे सांगितले गेले. तिचे वडील व शिक्षकांनी तिला भनवड व नंतर वणी येथे खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर तिला जिल्हा रुग्णालयात दाखल केले. तिला जीबीएस आजार असल्याचे निष्पन्न झाले. डॉक्टरांनी उपचार केले. मात्र, उपचार सुरु असताना तिची प्राणज्योत मालवली.

## ‘मराठी गझल वैभव मला पुढे न्यायचं’

एनएससीआय डोम येथे झाला. यावेळी ६० आणि ६१ वे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते. भीमराव पांचाळे यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यासोबत सन्मानचिन्ह आणि १० लाख रुपये बक्षीस देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.